




दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार ७ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# महिलांना महिन्याला ३ हजार रुपये देणार: बसमध्ये प्रवास फ्रि; राहुल गांधी यांनी दिली महागॅरंटी



महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर आता महाविकास आघाडीकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या योजनेचं वचन देण्यात आलं आहे. महाविकास आघाडीने आज चार मोठे आश्वासन दिले आहेत. यापैकी महालक्ष्मी योजनेचं वचन महाविकास आघाडीकडून देण्यात आलं आहे. महाविकास आघाडीच्या या 4 मोठ्या घोषणांमुळे आता विधानसभेच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट आला आहे. मविआची आज मुंबईतील बीकेसी येथे सभा पार पडली. या सभेला राज्यातील मविआच्या प्रमुख नेत्यांसह काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील उपस्थिती लावली. यावेळी राहुल गांधी यांनी राज्यातील जनतेने मविआ सरकारला निवडून दिलं तर मविआ सरकार राज्यातील महिलांना महिन्याला 3 हजार रुपये खटाखट खटाखट देणार, असं वचन राहुल गांधी यांनी दिलं.

## महिलांना बसचा प्रवास फ्री करणार

"महाराष्ट्रातील महिला बसमधून कुठे जाईल तेव्हा त्यांना बस तिकीट खरेदी करण्यासाठी पैसे देण्याची गरज नाही. फ्रिमध्ये जाईल. कारण ज्या भाजप सरकारने महागाई दिली, गॅस सिलिंडरची वाढवलंय. त्याचं सर्वाधिक वेदना महाराष्ट्रातील महिलांना होत आहे", असं राहुल गांधी म्हणाले.

"एकीकडे अब्जाधीशांचं सरकार आणि दुसरीकडे गरीब आणि शेतकऱ्यांचं सरकार आहे. त्यामुळे इंडिया आघाडीने महाराष्ट्रातील जनतेला पाच गॅरंटी दिल्या आहेत. आज मला सांगितलं की या गॅरंटी पैकी पहिली गॅरंटी सांगावी. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि मल्लिकार्जुन खर्गे इतर गॅरंटीबद्दल सांगणार आहे. आम्ही महालक्ष्मी योजना आणणार आहोत. ३ हजार रुपये देणार. दर महिन्याला देणार आहोत. इंडिया आघाडीचं सरकार अकाऊंटमध्ये हे पैसे देणार आहे. महाराष्ट्रातील महिलांना ३ हजार रुपये खटाखटा खटाखट देणार आहोत", असं राहुल गांधी म्हणाले आहेत.

## राज्यात जातीय जनगणना करणार, राहुल गांधींचं आश्वासन

"देशात जाती जनगणना केली पाहिजे. सत्तेत आपला किती सहभाग आहे, संस्था कुणाच्या ताब्यात आहेत आणि संपत्ती कुणाच्या हाती आहेत, हे लोकांना कळलं पाहिजे. त्यासाठी आम्ही जाती जनगणनेची मागणी केली आहे. कर्नाटक आणि तेलंगनात आमचं सरकार आहे. आम्ही तिथे जाती जनगणना करण्यास सुरुवात केली आहे. पूर्वी सर्व्हे घरात बसून व्हायचे. सवाल अधिकारी तयार करायचे. पण पहिल्यांदाच सर्वेचे प्रश्न आम्ही जनतेकडून मागवले. लोकांशी मिटिंग केली. सवाल आले आणि तेच प्रश्न तेलंगनात विचारले जाणार आहे. असं करणारं तेलंगना हे पहिलं राज्य आहे. महाराष्ट्रात आमचं सरकार येताच जाती जनगणनेचं काम सुरू करणार आहे", असं राहुल गांधी यांनी सांगितलं. "दिल्लीत इंडिया आघाडीचं सरकार आलं तर आम्ही जाती जनगणना करू आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा तोडू. ही विचारधारेची लढाई आहे. संविधान संपलं तर दलित, आदिवासी आणि ओबीसींकडे काहीच राहणार नाही. जे काही तुम्हाला मिळालं, आयआयटी, आयआयएम, शिक्षण, आरोग्य सेवा, तुमच्या जमिनीचे संरक्षण संविधान करत आहे. जर अदानीवर थोडीसे निर्बंध आहे ते फक्त संविधानामुळेच आहे. हे पुस्तक केवळ एक पुस्तक नाही. त्यात महापुरुषांचे विचार आहे. भारतीयांचा आवाज हे पुस्तक आहे. यात आंबेडकर, फुले आणि गांधींचा आवाज आहे. नारायण गुरू, बुद्ध, बसवन्नाचा आवाज आहे. भारतीयांचा आवाज, गरीबांचा आवाज, ओबीसींचा आवाज आणि शेतकऱ्यांचा आवाज यात आहे. भाजप आणि संघ हळूहळू हा आवाज खत्म करू पाहत आहे. काहीही झालं तरी संविधानाला कुणीही हात लावू शकत नाही. इंडिया आघाडी आणि भारतीय जनता एकसाथ उभी आहे. आम्ही संविधान कधीच संपू देणार नाही", असं राहुल गांधी म्हणाले.

# जातीयवादि शक्तिला रोखण्यासाठी समविचारी उमेदवारास पाठिंबा देणार - विजय साळवे

माजलगाव : ( प्रतिनिधी ) विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची बैठक विजय साळवे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच व्यंकटेश हॉटेल येथे संपन्न झाली. यावेळी आपण जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीत कोणासोबत जायचे याची चर्चा करण्यात आली व पुढे कार्यकर्त्यांना बोलताना जिल्हाध्यक्ष विजय साळवे यांनी सांगितले की गेल्या विधानसभा निवडणुकीत जातीयवादी पक्षांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी आपण आमदार प्रकाश सोळंके यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलो आणि विजय मिळाला तसेच गेल्या तीन महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीतही आपण बजरंग सोनवणे यांच्यासोबत राहण्याचा बिनशर्त निर्णय घेतला आणि निसटता का होईना पण आपण विजय मिळवण्यात यश प्राप्त केले आणि आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीतही आपण जातीवादी पक्षांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी समविचारी पक्षासोबत चर्चा करून पाठिंबा देणार आहोत भाजपाचा अजेंडा हा वन नेशन वन इलेक्शन हा आहे म्हणजेच घटनेवर घाला आहे ही गोष्ट लक्षात घेऊन जातीयवादी शक्ती सत्तेपासून दूर ठेवण्याची गरज आहे त्यामुळे जो आपल्या विचाराशी बांधील असेल अशा उमेदवाराला पाठिंबा देऊन



आपण निवडून आणणारच आहोत असा निर्धार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या बैठकीत विजय साळवे यांनी व्यक्त केला. या बैठकीस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ॲड. नंदकिशोर खळगे, पंडित ओव्हाळ, बी जी शिंदे, राजकुमार मोरे, वशिष्ठ लांडगे, अंजेराम घनघाव, धम्मानंद गावडे, सय्यद अनवर, शेख नाजेर, शेख अर्शद, सय्यद अकबर, संतोष खुणे, भास्कर पौळ, राजरत्न डोंगरे, राहुल मोरे, सचिन खोपे, विश्वनाथ तोडकर, सुरेश साळवे, बबन भालेराव, राहुल सिरसाट, विलास खळगे, निवृत्ती गायकवाड, साहेबा टाकणखार, मच्छिंद्र कांबळे, गोपाळ नाईकनवरे, आनंद साळवे, चंद्रकांत टाकणखार यांच्या सह इतरही कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# तलाठ्याने काल मागितली लाच; आज अडकला लाचेच्या जाळ्यात



जालना प्रतिनिधी/ जालना- शहरातील एका रहिवाशाने शहरातच घेतलेला भूखंड आपल्या नावावर करून घेण्यासाठी तलाठ्याकडे विहित नमुन्यात अर्ज केला. परंतु भूखंड काही नावावर होत नव्हता . त्यामुळे त्याने तलाठ्याशी संपर्क केला त्यानंतर तलाठ्याने 25 हजार रुपयांची लाच मागितली. लाच मागणाऱ्या तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज रंगेहात पकडले. जालना शहर सज्याचे तलाठी दुर्गेश गणेश गिरी वय 40 वर्ष यांची नियुक्ती सध्या तहसील कार्यालय जालना येथे आहे. त्यामुळे जालना शहरात सर्वे नंबर 284 मधील प्लॉट क्रमांक 40 च्या मालकांनी खरेदी केलेल्या या भूखंडाचा फेर स्वतःच्या नावावर करण्यासाठी तलाठी कार्यालयाकडे विहित नमुन्यात कागदपत्रांची पूर्तता केली. परंतु तलाठ्याची हे काम करण्याची इच्छा नव्हती म्हणून काल दिनांक पाच रोजी तलाठी आणि या भूखंडाच्या मालकांमध्ये बोलणी झाली आणि तलाठ्याने 25हजार रुपयांची लाच मागितली. परंतु भूखंड मालकाची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने लगेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे संपर्क केला आणि या विभागाच्या अधिकाऱ्यांनी या मागणीची शहानिशा केली .त्यावेळी तलाठ्याने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. सदरील लाच आज दिनांक सहा रोजी तहसील कार्यालयात तलाठ्याकडे दिल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापा मारला आणि या तलाठ्याला रंग हात पकडले. दुर्गेश गिरी या वर्ग तीनच्या शासकीय कर्मचाऱ्यावर कदीम जालना पोलीस ठाण्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गेवराई विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार प्रा. अण्णासाहेब मतकर यांच्या प्रचाराला सुरुवात,

बीड प्रतिनिधी, अंकुश गवळी

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रीय समाज पक्षाचे अधिकृत उमेदवार, प्रा अण्णासाहेब मतकर यांनी आज गेवराई विधानसभा मतदारसंघातील प्रचाराला सुरुवात केली आहे, त्याच पार्श्वभूमीवर , श्री क्षेत्र नारायण गड या ठिकाणी जाऊन, आशीर्वाद घेतले, व त्या ठिकाणी ग्रामीण भागातील जनतेमध्ये जाऊन प्रचाराला सुरुवात केली आहे, व गेल्या अनेक वर्षापासून मतकर जिल्ह्याच्या सामाजिक राजकीय क्षेत्रात अग्रेसर आहेत, राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकारी व वरिष्ठांनी मतकर यांना न्याय दिला आहे, गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या जागेवर त्यांना लढण्यास इच्छुक केले आहे, व ते येणाऱ्या कळत त्यांनी कार्यकर्त्यांची एक मोठी बांधणी केली आहे, त्यामुळे प्रस्थापितांच्या विरोधात एक नवीन चेहरा रासपणे दिला आहे, त्यांना जनतेचा खूप मोठा प्रतिसाद भेटत आहे,



# वाण नदीपात्रात अवैध दारु भट्टीवर गुन्हे शाखेचा छापा

## २ लाख ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त, २ घोडे, दुचाकीचा समावेश

प्रतिनिधी | बीडअंबाजोगाई शहराजवळ असलेल्या कुरणवाडी तांडा शिवारातील वाण नदी पात्रात सुरु असलेल्या गावठी दारु अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारला. दोन ठिकाणी मारलेल्या छाप्यात एकूण २ लाख ४१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात दारु तयार करण्यासाठीच्या रसायनासह १ दुचाकी व एक घोड्यांचा समावेश आहे. या प्रकरणी दोन जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध दारु विक्री विरोधात पोलिसांनी मोहिम सुरु केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे सहायक उपनिरीक्षक पी. टी. चव्हाण, बाळकृष्ण जायभाये, मारुती कांबळे, अर्जुन यादव, सचिन आंधळे व वडमारे यांना मिळालेल्या माहितीवरुन त्यांनी अंबाजोगाईच्या कुरणवाडी जवळ असलेल्या वाण नदीपात्रात २ ठिकाणी छापा टाकला. यात अमीर मदार चौधरी (रा. गवळीपूरा) हा पोलिसांना पाहून पळून गेला. त्याच्या हातभट्टी अड्ड्यावरुन तयार दारु,दारू तयार करण्यासाठीचे रसायन,ती वाहुन नेण्यासाठी 01 घोडा असा एकूण १ लाख ६० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सफौ. पी. टी. चव्हाण यांच्या तक्रारीवरुन गुन्हा नोंदवला गेला. तर, दुसऱ्या कारवाईत पाशा सत्ता चौधरी (रा. गवळीपूरा) याच्या हातभट्टी अड्ड्यावरुन तयार दारू, रसायन व दखरू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येनारी १ दुचाकी असा ८० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला. या प्रकरणी पोह.बाळकृष्ण जायभाये यांच्या तक्रारीवरुन गुन्हा नोंदवला गेला. एसपी अविनाश बारगळ,सचिन पांडकर,अप्पर पोलीस अधीक्षक बीड,उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली गेली.

# अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात बीड मतदारसंघाचा विकास होईल- डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)** दि.६ : गेली अनेक वर्ष माझे वडील डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीडच्या नगराध्यक्षपदी काम केलेले आहे. त्यामुळे त्यांचा आणि माझाही जनसंपर्क हा बीड शहरात होता. पण आता आम्हाला ग्रामीण भागातूनही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनताही आमच्यासोबत आहे. ना.अजितदादा यांच्या नेतृत्वाखाली बीड मतदारसंघाचा विकास होईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते मुंबईतून बुधवारी (दि.६) पक्षाच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. तर बीडमधून पक्षाच्या संपर्क कार्यालयात प्रकाशन सोहळ्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वात प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड.प्रज्ञा खोसरे, माजी नगरसेवक गणेश वाघामारे, बाबूराव दुधाळ, प्रेम चांदणे, रणजित बनसोडे, भास्कर जाधव, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवक तालुकाध्यक्ष नंदू कुटे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने अद्ययावत आरोग्य सुविधेचा वादा, सर्वांनी शिक्षणाच्या पायाभरणीचा वादा, दर्जेदार आणि पायाभूत सुविधांचा वादा, शेती व शेतकऱ्यांच्या विकासाचा वादा, सामाजिक विकासाचा वादा, असे सगळे वादे ना.अजितदादा पवार हे या निवडणुकीत घेऊन आलेले आहेत. त्यांच्या दूरदृष्टी नेतृत्वात महाराष्ट्र राज्याचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. आजपर्यंत आपणही बीड शहरात, ग्रामीण भागात असतील, ज्या काही सुविधा उपलब्ध करून देऊ शकलो, त्या ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत देऊ शकलेलो आहोत. यापुढेही बीड तालुका, शिरूर तालुक्याच्या भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी भरभक्कमपणे उभे राहावे, असे आवाहन देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

## राष्ट्रवादीचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष आ.इद्रिस नाईकवडी यांचे जंगी स्वागत

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इद्रिस नाईकवडी हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचे बीडमध्ये आगमन झाल्यानंतर जंगी स्वागत करण्यात आले. त्यांनी अल्पसंख्याक समाजातील नागरिकांशी संवाद साधला. त्यांचे बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. ते अल्पसंख्याक समाजाच्या मेळाव्याला संबोधित करणार होते. कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# माझिया माहेरा जा कवितेस चालदाते!

(8 नोव्हेंबर- पु.ल.देशपांडे जयंती विशेष.)

गुळाचा गणपती आणि सबकुछ पु.ल. म्हणून गाजलेल्या चित्रपटात पु.ल.देशपांडे यांच्या प्रतिभेच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. ते शिक्षक, लेखक, नट, नकलाकार, गायक, नाटककार, विनोदकार, कवी, पेटीवादक, संगीत दिग्दर्शक, वक्ते आदी होते. त्यांनी एकपात्री-बहुपात्री नाटक, चित्रपट, नभोवाणी, दूरचित्रवाणी अशा सर्व क्षेत्रांत काम केले. अशा हरहुन्नरी व्यक्तिमत्वाची ओळख त्यांच्या जयंती निमित्त श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजीं करून देत आहेत... संपादक.

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल.देशपांडे ऊर्फ भाई ऊर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते. त्यांना महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असे म्हटले जाते. त्यांच्या आद्याक्षरांवरून महाराष्ट्रात ते पु.ल.म्हणून ओळखले जातात. त्यांचे मराठी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे अनेक किस्से आहेत. त्यांच्यावर मराठीत भाई हा चित्रपट बनला आहे. या चित्रपटाचे दोन भाग आहेत. ते हजरजबाबीही होते, त्यामुळे त्यांची शेकडो वाक्सुमने आणि विनोदी किस्से आहेत. मराठी साहित्य व संगीतातील योगदानाव्यतिरिक्त पुलंचे आकाशवाणी, दूरदर्शन, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील कार्य लक्षणीय आहे. ते उत्तम संवादिनी वादक होते, तसेच त्यांनी काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शनही केले. पु.ल.देशपांडे यांचा जन्म दि.८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू- सीकेपी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले. त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले आणि नंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात ते शिकले. सन १९४०च्या दशकात साहित्यक्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ शाळेमध्ये शिक्षक होते. सन १९४६ साली ते सुनीताबाईंशी विवाहबद्ध झाले. लेखक आणि कविवर्य वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी हे त्यांचे आजोबा होते. ते साहित्याचे जाणकार होते. रवीन्द्रनाथ टागोर लिखित गीतांजली हा काव्यसंग्रह त्यांनी अभंग गीतांजली या नावाने मराठीत भाषांतरित केला होता.

देशपांडे यांचे वडील हे अडवाणी कागद कंपनीत दीडशे रुपये पगारावर फिरते विक्रेते होते. फिरतीवर असताना जेवणाखाण्याचा भत्ता मिळे. एकदा कोल्हापूरला असताना ते बहिणीकडे जेवले. त्यादिवशी त्यांनी भत्ता घेतला नाही, अशी आठवण पु.ल.देशपांडे यांनी सांगितली. ते लहानपणापासूनच धष्टपुष्ट होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी ते पाच वर्षांच्या मुलाएवढे दिसत होते. ते हुशार होते आणि सतत काही ना काही करत असत. त्यांना स्वस्थ बसण्यासाठी घरचे लोक पैसा देऊ करायचे, पण हे त्यांना जमले नाही. आजोबांनी लिहून दिलेले आणि त्यांनी पाठ केलेले दहा-पंधरा ओळींचे पहिले भाषण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या शाळेत हावभावासहित खणखणीत आवाजात म्हणून दाखवले. सात वर्षे अशी भाषणे केल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षापासून ते स्वतःची भाषणे स्वतःच लिहू लागले. ते इतरांनाही भाषणे आणि संवाद लिहून देऊ लागले. त्यांना घरात खुप वाचन करायला व रेडिओवरील संगीत ऐकायला मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत. ते घरीच बाजाची पेटी शिकले. टिळक मंदिरात एकदा बालगंधर्व आले असता त्यांनी पेटी वाजवून दाखवली. बालगंधर्वांनी शाबासकी दिली व भावी कलाजीवनासाठी शुभेच्छा दिल्या. लोकांच्या वागण्यातील विसंगती व हास्यास्पद गोष्टी हेरून ते त्या लोकांच्या नकला करायचे. म्हणून घरी कुणी आले असता पुरुषोत्तम जवळ नसलेलाच बरा, असे आईला वाटत असे. त्यांची आई कारवारी, वडील कोल्हापूरचे आणि बहीण कोकणात दिलेली, त्यामुळे घरात भोजनात विविधता असे. यातूनच ते खाण्याचे शौकीन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते गाण्याच्या, पेटीच्या व अन्य शिकवण्या घेऊ लागले. ते शाळेत असल्यापासूनच भावगीते गायचे आणि गीतांना चाली लावायचे. कॉलेजात असताना त्यांनी राजा बढे यांच्या माझिया माहेरा जा या कवितेला चाल लावली. आज ते गाणे मराठी भावसंगीतातील अनमोल ठेवा समजला जातो. ग.दि. माडगूळकरांनी लिहिलेल्या व भीमसेन जोशींनी गायलेल्या इंद्रायणी काठी या गीताला त्यांनी चाल लावली होती. तेही गाणे अजरामर झाले.

कॉलेजमध्ये असताना पु.ल. गायकांना साथ करीत. ते पेटी वाजवत, त्यांचा भाऊ रमाकांत तबला आणि मधुकर गोळवलकर सारंगी वाजवीत. मिळालेले १५ रुपये तिघेही वाटून घेत. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ते मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी झाले. कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात ते काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बीए आणि एमए केले. याच महाविद्यालयात असताना त्यांनी चिंतामण कोल्हटकरांच्या ललित कलाकुंज व नाट्यनिकेतन या नाट्यसंस्थांच्या नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. सन १९३७पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या पैजार या श्रुतिकेत काम केले. सन १९४४ साली त्यांनी लिहिलेले पहिले व्यक्तिचित्र भट्या नागपूरकर हे अभिरुची या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले. याच दरम्यान त्यांनी सत्यकथामध्ये जिन आणि गंगाकुमारी ही लघुकथा लिहिली. सन २०१४मध्ये प्रकाशित झालेले बटाट्याची चाळ हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. सन १९४८ साली त्यांनी तुका म्हणे आता हे नाटक आणि बिचारे सौभद्र हे प्रहसन लिहिले.

दूरदर्शनच्या पहिल्यावाहिल्या प्रसारणासाठी पंडित नेहरूंची दूरदर्शनसाठी मुलाखत घेणारे पुलं हे भारतीय दूरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते. साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी या दोहोंचे पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या प्रतिभावंतात त्यांचा समावेश होतो. मुंबईच्या नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स-एनसीपीए या संस्थेत पुलंनी अनेक प्रयोग केले. संशोधकांना आधारभूत होतील असे असंख्य संदर्भ, कलांचा इतिहास, ध्वनिफिती, मुलाखती, लेख आदी बरेच साहित्य त्यांनी जमा करून ठेवले आहे. मराठी नाटकाचा आरंभापासूनचा इतिहास त्यांनी अशा जबरदस्त प्रयत्नान्ती जमा केला की त्यांच्यावरून स्फूर्ती घेऊन भारतातील अनेक जणांनी त्यांच्या त्यांच्या प्रांतांतील कलांचा इतिहास जमा करून नोंदवायची सुरुवात केली.

# संदीप क्षीरसागर यांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा अनिलदादा जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश

## विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे करणार परिषदेचे निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ

बीड, प्रतिनिधी- निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदरच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार तथा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सोडचिट्टी देत बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश केला आहे. अनिलदादा जगताप हे तळागाळातील माणसांची जाण लोकप्रिय नेते आहेत. बीड विकासाची धुरा अनिलदादा यांच्या हाती आल्यास ते बीड विकासाचा कायापालट करतील. असा विश्वास व्यक्त करत बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या अविनाश पाटोळे ग्रामपंचायत सदस्य माळस जवळा, सचिन पाटोळे, दत्ता पाटोळे, अभिषेक पाटोळे, अरविंद पाटोळे, करण पाटोळे, केशव पाटोळे, योगेश पाटोळे, आकाश गवळी, आकाश सोनवणे, अशोक लोखंडे, रणजित पाटोळे, नागेश पाटोळे, शहादेव पाटोळे, रमेश पाटोळे, रवींद्र पाटोळे, महादेव पाटोळे, गणेश पाटोळे, दिलीप पाटोळे यांच्यासह शेकडो पाटोळे मित्रपरिवाराने अनिलदादा जगताप यांच्याकडे काल दि. 6 नोव्हेंबर रोजी रात्री 8.00 वाजताच्या दरम्यान जाहीर प्रवेश करत त्यांच्या विजयासाठी वज्रमुठ आवळली आहे. अनिलदादा जगताप यांनी सर्व तरुणांचे सहर्ष स्वागत करत त्यांचा स्वतःकडे प्रवेश करून घेतला. दरम्यान अनिलदादा



जगताप यांनी माळस जवळा येथील तरुणाईचे साथ विधानसभा निवडणुकीत मोलाची भूमिका बाजावेल असा विश्वास व्यक्त केला. निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी आहे. तसेच आता खऱ्या अर्थाने भरकटलेली तरुणाई योग्य ठिकाणी आली असल्याची भावना अनिलदादा जगताप यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली. याप्रवेश सोहळ्या प्रसंगी अनिलदादा जगताप यांचे कार्यकर्ते, समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतुल मुंडे विरुद्ध शासन खटल्यात केज येथील प्रथमवर्ग न्यायालयाने पोलिसांना दिले फेरतपासणी करण्याचे आदेश.

## दत्तात्रय(पिंटू)ठोंबरेंची गाडी आडवुन पिस्तूल दाखवून धमकी दिलेल्या प्रकरणाचा होणार फेरतपास

## न्यायालयाच्या आदेशाने वाढल्या आरोपी अतुल मुंडेच्या अडचणी

बीड दि. ६ ( प्रतिनिधी): केज पंचायत समितीचे माजी सदस्य दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे यांना अडवून पिस्तूल दाखवून धमकावल्याच्या प्रकरणात फेरतपास करण्याचे व गुन्ह्यात वापरलेली पिस्तूल जप्त करण्याचे आदेश केजच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिले आहेत. यामुळे चार वर्षापुर्वीच्या या प्रकरणात आरोपी अतुल विक्रम मुंडेच्या अडचणी वाढल्या आहेत. केज पंचायत समितीचे तत्कालीन सदस्य दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे यांनी तत्कालीन जिल्हापरिषद सदस्य विजयकांत मुंडे यांच्या सांस्कृतिक सभागृह घोटाळा आणि इतर प्रकरणात तक्रारी केल्या होत्या. यावरुन विजयकांत मुंडेंचा भाऊ असलेल्या अतुल विक्रम मुंडेने पिंटू ठोंबरे यांची गाडी अडवून त्यांना पिस्तूल दाखवत धमकावल्याची तक्रार केज पोलिसांत करण्यात आली होती. चार वर्षापुर्वी या प्रकरणी केज पोलीसात भारतीय शस्त्र कायद्यासह इतर कलमांखाली गुन्हा दाखल झाला होता. पोलीसांनी या प्रकरणात आरोपीने वापरलेली पिस्तूल जप्त न करता,अनोळखी ईतर तिन आरोपी सिस्पन्न न करता वरील रिव्हॉलवर प्रकरणातील दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले होते.आरोपीनी अटकपुर्व जामीन मिळवण्यासाठी शेषणकोर्ट,हायकोर्ट,सुप्रीम कोर्टात जामीन मांडुन देखील मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथील न्यायालयाने आरोपीने आज गाडी आडवुन रिव्हालवर रोखले उद्या गोळी घालेल त्यामुळे रिव्हॉल्वर जप्त केल्याशीवाय जामीन नाकारण्यात आलेली होती ते नंतर मा.सुप्रीम कोर्ट दिल्ली आरोपीच्या वतीने जामीन मांडण्यात येऊन आरोपीच्या वतीने प्रकरण विड्राल करण्यात आले होते तिन महीण्याच्या फरारी नंतर आरोपीस पोलिसांनी अटक करुन केज कोर्टात हजर केले असता आरोपीला अटक केली त्याच दिवशी न्यायलयीन कोठडी सुनावली होती संबधीत प्रकरणी माझेवर झालेल्या प्राणघातक हल्ल्यात वापरण्यात आलेले शस्त्रा सह ईतर तिन अनोळखी आरोपी निष्पन्न न करता सेम डेला जामीन दिल्या प्रकरणी पिंटू ठोंबरे यांनी केजच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात 'प्रोटेस्ट' याचिका दाखल केली होती. यावर न्या. पी. व्ही. पाटील यांच्यासमोर सुनावणी झाली. शस्त्र कायद्याखाली दाखल गुन्ह्यात शस्त्र जप्त न करताच दोषारोप पत्र दाखल करण्याची तपास अधिकाऱ्याची कृती संशयास्पद असून आरोपीला बचावासाठी फायदेशीर ठरणारी असल्याचे निरीक्षण नोंदवित आता न्यायालयाने या प्रकरणाचा फेरतपास करण्याचे आदेश दिले आहेत. तीन महिन्याच्या आत या प्रकरणात पिस्तूल वापरण्यात आले होते का आणि असल्यास ते पिस्तूल कोठे आहे याचा तपास पुर्ण करण्याचे आदेश न्यायालयाने तपास अधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे आता आरोपी अतुल विक्रम मुंडेच्या अडचणी वाढल्या आहेत.

# संविधान वाचवणे फडणवीसांना शहरी नक्षलवाद वाटतो का?:

## भाजपाच्या शक्ती स्थळाजवळ कार्यक्रम घेतल्याने जळफळाट

मुंबई :लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागपुर मधील पहिल्याच कार्यक्रमाने भारतीय जनता पक्ष व देवेंद्र फडणवीसांची पळता भुई थोडी झाली असून घाबरलेल्या फडणवीसांचे ताळतंत्र सुटल्याने ते राहुल गांधींवर खोटे नाटे आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. हिंदु धर्मात लाल रंग शुभ मानला जातो पण भाजपाला तो ही अपवित्र वाटू लागला आहे. संविधानाच्या पुस्तकाचा रंग लाल, पिवळा का काळा असावा हे ठरविण्याचा अधिकार संविधान विरोधी लोकांना नाही. संविधान संविधान वाचवणे भाजपा व फडणविसांना शहरी नक्षलवाद वाटतो का? भारत जोडो यात्रेत राहुल गांधी सोबत चालणारी मराठी



माणसे शहरी नक्षलवादी आहेत का असा सवाल विचारून देवेंद्र फडणवीसांनी भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील सर्व नागरिकांची माफी मागावी असा घणाघाती हल्ला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राहुल गांधी संविधान 'बचाओ'ची भूमिका हाती घेत संविधानाचे पुस्तक दाखवत असतात. ज्या लोकांनी आरक्षण व संविधानाला विरोध केला, संविधान जाळले त्या व्यवस्थेच्या बाजूला भाजपाच्या शक्तीस्थळाजवळच सुरेश भट्ट सभागृहात राहुल गांधींचा संविधान संमेलन कार्यक्रम झाला, त्यामुळे भाजपाचा जळफळाट झाला आहे. मनुवादी विचारसरणीचे हे लोक त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत पण राज्यातील जनता सुज्ञ आहे भाजपाला ते त्यांची जागा दाखवतील, असेही नाना पटोले म्हणाले.

---

# नव मतदार युवक युवतीनी मतदान करताना उमेदवार हा उच्चशिक्षित सुसंस्कृत, कर्तव्यदक्ष,चरित्रशील, पाहुन मतदान करावे - मेघना मगर

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात व परळी मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी दैनिक कांतीकारी साथी जय महाराष्ट्र महिला संघटना व आईसाहेब जिजाबाई सेवा संस्थेच्या वतीने नवीन नोंदणी झालेले युवा मतदार व इतर मतदारांना साठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना संस्था व संघटनेच्या अध्यक्षा मेघना मगर म्हणाल्या की आज समाजात मतदानाचा बद्दल उदासीनता दिसून येत आहे मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. पण लोक याच्या कडे हॉली डे म्हणून पाहात आहे हे लोकशाही च्या दृष्टीने घातक आहे. तरी आपण मतदान नक्की करावे असे आवाहन त्यांनी केले तसेच नव मतदार युवक युवती



नी व सर्वांनी मतदान करताना उमेदवार हा उच्चशिक्षित, सुसंस्कृत, कर्तव्यदक्ष, चरित्रशील, पाहुन मतदान करावे असे ही म्हणाल्या. यावेळी या कार्यक्रमाला दैनिक कांतीकारी साथी च्या संपादक सौ वर्षा मगर यांच्या सह जय महाराष्ट्र महिला संघटनेचे सर्व पदाधिकारी आईसाहेब जिजाबाई सेवा संस्थेचे पदाधिकारी हनुमंत मगर, बसवेश्वर खोत, गणेश मगर, अतिष विधाते सुरज काळे शेख गफार, रवी मगर सारिका झाटे पद्मिनी बरिदें व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# विधानसभा निवडणूक २०२४

# निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे - हिर्देशकुमार

## छत्रपती संभाजी नगर येथील पूर्वतयारी आढावा बैठकीत आयोगाचे निर्देश

## बीड येथून निवडणूक निरीक्षक, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी ऑनलाइन उपस्थित

बीड, दि.6 :- निवडणूक प्रक्रिया राबवितांना त्यात कोणत्याही शंकेला वाव असता कामा नये याची खबरदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावी व निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उपनिवडणूक आयुक्त हिर्देशकुमार यांनी आज निवडणूक यंत्रणांना दिले.

छत्रपती संभाजी नगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठक आज पार पडली. या बैठकीस राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, अति.मुख्य निवडणूक अधिकारी बी. प्रदीपकुमार, उपसचिव सुमनकुमार, संजयकुमार, अभिलाष कुमार, अनिलकुमार, अविनाशकुमार तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्रा, पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड आदी उपस्थित होते.
प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता जपा प्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांनाच सर्व प्रक्रिया राबवावयाची आहे. राबवित असलेल्या निवडणूक विषयक कामकाजाबाबत प्रत्येक टप्प्यावर राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी व प्रक्रिया राबवावी. त्याचे दस्तऐवजीकरण करावे. त्यांचे शंकानिरसन करावे. निवडणूक प्रक्रिया राबवितांना पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,असे हिर्देशकुमार यांनी सांगितले.
मतदान केंद्रांवर सर्व सुविधा पुरवा मतदार याद्यांबाबतही योग्य ती काळजी घेऊन त्या याद्या अधिक बिनचूक असाव्यात. प्रत्येक मतदारापर्यंत मतदान चिठ्ठ्या वेळत पोहोचतील याचे नियोजन करा. मतदार याद्यांविषयी असलेल्या तक्रारींबाबत तात्काळ दखल घ्यावी. मतदान केंद्रांबाबतही सर्व यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. प्रत्येक मतदान केंद्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था, तात्पुरत्या मतदान केंद्रांची मान्यता घेणे, मतदान केंद्राचे ठिकाण बदलले असल्यास त्याबाबत मतदारांपर्यंत माहिती पोहोचविणे, त्याची प्रसिद्धी करणे, विशेष मतदान केंद्रांची निर्मिती करणे जसे. पर्यावरणपूरक, महिलांनी, दिव्यांग कर्मचाऱ्यांनी संचलित केलेले इ, मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, रॅम्प, सावली इ. सुविधांची निर्मिती, तसेच वेब कॅमेरे व सीसीटीव्ही कॅमेरे लावून मतदान केंद्रांचे वेबकास्टिंग करणे, मतदान केंद्राच्या बाहेर व आत कॅमेरे लावावे इ. सुचना दिल्या. तसेच या सर्व सुविधांची पूर्तता झाल्याबाबत व आवश्यकतांबाबत स्वतः जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त यांनी स्वतः पाहणी करुन खातरजमा करावी,असे निर्देशही देण्यात आले.

यंदा मतदान हे नोव्हेंबर महिन्यात असून आता सुर्यास्त लवकर होईल, अशा वेळी सायंकाळी मतदान केंद्रांवर पुरेशा प्रकाशासाठी दिवे लावण्याची सुविधा करावी,अशी सूचना देण्यात आली. कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्रात मोबाईल नेता येणार नाही, याबाबत योग्य ती काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले. टपाली मतदान व गृह मतदान प्रक्रियेबाबतही यंत्रणांनी पूर्ण प्रक्रिया व्यवस्थित राबवावी. गृह मतदान कार्यक्रम अगोदर जाहीर करावा. त्याबाबत उमेदवारांना कळवावे.
मतदान कर्मचाऱ्यांसाठी सुविधा द्या निवडणूक कामकाजासाठी लागणारे पुरेस मनुष्यबळ उपलब्ध असल्याची खात्री करावी. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जेवण, पिण्याचे पाणी, कामकाजाची सुविधा,




मतदान केंद्रांवर गेल्यावर मुक्काम, मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता, सुरक्षितता, भोजन, पाणी याबाबतची व्यवस्था पुरविण्यात यावी. महिला कर्मचाऱ्यांना विशेष सुरक्षा व सोयी सुविधा द्याव्या. निवडणूक कामकाजात कर्मचाऱ्यांना अचानक उद्भवणाऱ्या आजारांसाठी तात्काळ वैद्यकीय सेवा देण्याचे नियोजन असावे. त्यासाठी स्थानिक पातळीवर रुग्णालयांमध्ये खाटा राखीव ठेवाव्या. प्रत्येक निवडणूक कर्मचाऱ्याची योग्य काळजी घेतली जाईल, याची खबरदारी घ्यावी.
सी-व्हिजिल वरील तक्रारींचे तत्काळ निराकरण करा प्रत्येक जिल्ह्यात व विधानसभा क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यासाठी सर्व संलग्न जिल्ह्यांच्या पोलीस यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवावा. मद्य, अंमलीपदार्थ, मौल्यवान वस्तू, रोकड यांच्या अवैध वाहतुकीवर नजर ठेवून कारवाई करावी. याबाबत सी व्हिजील ॲपवर येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन कारवाई करावी. या तक्रारींचे तत्काळ निराकरण झाले पाहिजे, याबाबत विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले.
फेक न्यूजला तत्काळ पायबंद निवडणूक काळात माध्यमांमध्ये येणाऱ्या बनावट बातम्या, फेक न्यूज अर्थात खोट्या माहितीचे प्रसारण तत्काळ रोखावे. खोटी माहिती असल्यास तिचे प्रसारण रोखून सत्य माहितीचे तात्काळ प्रसारण करावे. याबाबत या विभागाशी संबंधित बातम्या असतील त्यांनी तात्काळ योग्य माहिती पुरवावी व वस्तूस्थिती जनतेसमोर मांडावी, जेणेकरुन निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होणार नाही व त्याबाबत गैरसमज निर्माण होणार नाही.
मतदार जनजागृतीवर भर द्या मतदारांचे मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी आयोगामार्फत लवकरच 'स्विप' उपक्रम मोठ्याप्रमाणावर राबविले जाणार आहेत. ते सर्व उपक्रम आपल्या विधानसभा क्षेत्रात राबवावेत. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत्न करावे. मतदारांना मतदान करणे सोईचे व सुलभ व्हावे यासाठी उपाययोजना राबवाव्यात.
अचूक आकडेवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी मतदानाचे प्रमाण नेमके कळावे व त्यातील आकडेवारीत अधिक अचूकता यावी यासाठी या निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी विधानसभा मतदार संघस्तरावर, जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर नेमण्यात येणार आहे. मतदान टक्केवारीची आकडेवारी बूथनिहाय पडताळणी करुन मतदान टक्केवारी अचूक देण्यात येईल यासाठी ही उपाययोजना करण्यात आल्याचेही निवडणूक उपायुक्त यांनी सांगितले.
मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. एस. चोकलिंगम म्हणाले की, राजकीय पक्ष उमेदवारांना वेळोवेळी अद्यावत निर्णय व माहिती देऊन अवगत करावे.मतमोजणीसाठी मतमोजणी केंद्राच्या पुनर्रचनेचा आराखडा नव्याने मंजूर करावयाचा असल्यास त्याचे प्रस्ताव तातडीने पाठवावे. टपाली मतमोजणीबाबतच्या व्यवस्थेसह आराखडा मंजूर करावा. निवडणूक कामकाजाविषयी सर्व अहवाल वेळेत व अचूक पाठविणे आवश्यक आहे. त्यात कोणतीही दिरंगाई व हयगय खपवून घेतली जाणार नाही. सर्व आकडेवारी अचूक पाठवावी. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व विधानसभा क्षेत्रातील कामकाजावर लक्ष ठेवावे. पैशांचा वापर, माध्यमांमध्ये येणारी माहिती आणि असामाजिक तत्वांचा वावर याबाबत सजग राहून वेळीच कारवाई करावी.
यांची होती उपस्थिती बैठकीस नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक, लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी, गोंदिया जिल्हाधिकारी प्राजित नायर, भंडारा जिल्हाधिकारी संजय कोलते, वाशिम जिल्हाधिकारी बुवनेश्वरी.एस, वर्धा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, गडचिरोली जिल्हाधिकारी संजय दैने, हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल तसेच बीड पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, बीडचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, धाराशिव पोलीस अधीक्षक संजय जाधव, गोंदिया पोलीस अधीक्षक गोरख भामरे, चंद्रपूर पोलीस अधीक्षक रिना जानबंधू, लातूर पोलीस अधीक्षक सोमय मुंढे, गडचिरोली पोलीस अधीक्षक नीलोत्पल, परभणी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंग परदेशी, हिंगोली पोलीस अधीक्षक एस. डी. कोकाटे, भंडारा पोलीस अधीक्षक नुरुल हसन, वर्धा पोलीस अधीक्षक अनुराग जैन तसेच दुरदृष्य पद्धतीने सर्व जिल्ह्यातील अधिकारी व या निवडणूकीसाठी नेमलेले निवडणूक आयोगाचे निरीक्षक सहभागी झाले होते.
बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून ऑनलाइन उपस्थिती या बैठकीस बीड जिल्हाधिकारी क.ार्यालयाच्या प्रगती सभागृहातून गेवराई, माजलगावच्या निवडणूक निरीक्षक लालटनपुई वॉंगचॉंग, बीड, आष्टीचे निवडणूक निरीक्षक भुवनेश प्रताप सिंग, केज-परळीचे निवडणूक निरीक्षक सुनिल अंचिपका, निवडणूक निरीक्षक (पोलिस) मल्लिका सुरेश, निवडणूक निरीक्षक (खर्च) कपील जोशी, निवडणूक निरीक्षक के.रोहन राज आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सतीश धुमाळ, माजलगावचे गौरव इंगोले, बीडच्या कविता जाधव, आष्टीच्या वैशाली पाटील, केजचे दीपक वजाळे, परळीचे अरविंद लाटकर ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते. तसेच प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, स्वीपचे नोडल अधिकारी ओमकार देशमुख, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, तहसीलदार अविनाश शिंगटे आदींचीही उपस्थिती होती.
******

# लिंबागणेश येथील रखडलेल्या जलजीवन, स्मशानभूमीच्या कामांचा निवडणुकीत आ.संदिप क्षीरसागरांना फटका बसणार :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.४ ) बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल असणाऱ्या लिंबागणेश येथील आ.संदिप क्षीरसागर यांच्या गुत्तेदार कार्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे जलजीवन, स्मशानभूमीची कामे रखडलेल्या अवस्थेत असुन यामुळे लिंबागणेश ग्रामस्थांना विकत पाणी घेण्याची वेळ आली आहे तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.तर ८ लक्ष रूपये मंजूर झालेल्या स्मशानभूमीचे काम पावणे दोन वर्षांपासून रगडलेल्या अवस्थेत असुन अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असुन मृतदेहाची हेळसांड होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र संतापाची भावना असुन याचा आ.संदिप क्षीरसागर यांना विधानसभा निवडणुकीत फटका बसणार असल्याचे ग्रामस्थांनी बोलुन दाखवले.
८ लक्ष रुपये मंजूर स्मशानभूमीचे काम पावणे दोन वर्षांपासून रखडले ; मृतदेहाची हेळसांड:- डॉ.गणेश ढवळे लिंबागणेश येथील स्मशानभूमीची दुरावस्था असुन पत्रे उडुन गेलेले, बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असल्याने नविन स्मशानभूमी बांधकामासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी स्मशानभूमीत सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते.याची दखल आ.संदिप क्षीरसागर यांनी घेत जिल्हा वार्षिक (दहन/ दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षांकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. मात्र स्मशानभूमीचे काम आ.संदिप क्षीरसागर यांचे कार्यकर्ते करत असुन त्यांच्या नाकर्तेपणामुळे पावणे दोन वर्षांपासून काम रखडलेल्या अवस्थेत असुन पावसाळ्यात दि.१ सप्टेंबर रोजी कै.केशरबाई तुळशीराम नाईकवाडे यांचा अंत्यविधी दरम्यान पाऊस आल्याने तारांबळ उडाली होती. ताडपत्रीने झाकून अंत्यविधी



करण्यात आला होता. तर दि.२ नोव्हेंबर रोजी कासार समाजातील सीमा महेश साळवे यांच्या अंत्यसंस्कार करताना सभोवताली उगवलेले गवत, झाडेझुडपे यामुळे अंत्यसंस्कार करण्यास अडचणींना तोंड द्यावे लागले. पावणे दोन वर्षांपासून रखडलेल्या स्मशानभूमीच्या कामामुळे मृतदेहांची हेळसांड होत असुन आ.संदिप क्षीरसागर यांच्या बद्दल ग्रामस्थांनी तिव्र नाराजी व्यक्त केली असुन याचा फटका आ.संदिप क्षीरसागर यांना निवडणुकीत बसणार असल्याचे बोलले जात आहे.
८० लाखांचे जलजीवनचे काम बोगस ; जिल्हाधिकारी यांचे मुख्याधिकारी जि.प. यांना कारवाईचे आदेश:- डॉ.गणेश ढवळे भारत सरकारच्या जनशक्ती मंत्रालयाने २०१९ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक ग्रामिण कुटुंबाला दरडोई दररोज ५५ लिटर नळाचे पाणी नियमित पुरविण्याच्या उद्देशाने महत्वकांक्षी योजना अंमलात आणली.लिंबागणेश येथील जलजीवन योजनेसाठी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला मात्र आ.संदिप क्षीरसागर यांचे कार्यकर्ते यांनी कंत्राटदार यांच्या संगनमताने कागदोपत्रीच बोगस कामे करत शासनाची दिशाभूल करून निधी घशात घातला. त्यामुळे ग्रामस्थांवर विकत पाणी घेण्याची तर महिलांवर पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे. संबंधित प्रकरणात डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी बीड यांना लेखी तक्रारीनंतर जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद बीड यांना संबंधित प्रकरणी निवेदनातील मुद्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी असे नमूद केले आहे.

# मतदार संघातील दहशत मोडून काढण्यासाठी सज्ज व्हा - माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी प्रतिनिधी :- आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातील सर्व मतदार हे आमदारकीचे उमेदवार आहेत असे समजून प्रत्येकाने आपल्या गावोगावी व्यवस्थित मतदान करण्यासाठी फेऱ्या काढाव्यात, जनजागृती करावी व " शिट्टी " या चिन्हा समोरील बटन दाबून मोठ्या मताधिक्याने मला निवडून द्यावे. मतदार संघातील दहशत निपटून काढण्यासाठी मतदारांनी सज्ज व्हावे असे आवाहन मा.आ. भीमराव धोंडे. यांनी केले. आष्टी येथील बाजार तळावर आयोजित प्रचार शुभारंभाच्या सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सभापती ॲड. साहेबराव मस्के होते. याप्रसंगी व्यासपीठावर सौ. दमयंतीताई धोंडे, युवा नेते डॉ. अजयदादा धोंडे, जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, जि. प. सदस्य रामराव खेडकर, रामदास बडे,जि.प.सदस्य वर्षाताई माळी, अशोकराव सव्वाशे,ॲड. रत्नदीप निकाळजे,अभयराजे धोंडे, माजी सरपंच बबनराव औटे, माजी सरपंच बाळासाहेब पवार,माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड,रिपाई नेते अशोक साळवे, विठ्ठलराव बनसोडे,माजी सभापती नियामत बेग,सरपंच दादासाहेब जगताप, पांडुरंग गावडे, हरिभाऊ जंजिरे, किशोर खोले, राजपाल शेंडगे, गौतम ससाने, दिलीपराव काळे, माऊली पानसंबळ, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, देविदास शेंडगे,ॲड. खेडकर, ज्ञानदेव केदार, दिलीपराव म्हस्के, युवराज सोनवणे, रघुनाथ शिंदे व इतरांची उपस्थिती होती. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करुन व नारळ फोडून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

जलजीवन कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे असा घनाघाती आरोप मा. आ. भीमराव धोंडे यांनी विरोधकांवर केला. मतदारसंघात त्यांना भ्रष्टाचाराचे महामेरू म्हणून ओळखले जाते अशी टीकाही त्यांनी केली. माझ्या आमदारकीच्या काळामध्ये मी रस्ते, पिण्याचे पाणी, पाझर तलाव अशी अनेक विकासाची कामे केली. मतदार संघात १ हजार पाझर तलाव बांधले.



कोणावरही अन्याय झाला तरी आम्ही त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी धावून जाऊ मात्र त्यासाठी आपल्याला ही निवडणूक अत्यंत बहादुरीने लढावी लागणार आहे. ही निवडणूक तशी सोपी नाही मात्र निवडणूक जनतेने हातात घेतली आहे, त्यामुळे आपला विजय निश्चित आहे. सकाळी दहा वाजल्या पासूनच आष्टी,पाटोदा, शिरूर तालुक्यातील जनसमुदाय आष्टीकडे येत होता . त्यामुळे नगर - बीड रस्त्यावर मोठ्या संख्येने चारचाकी व दुचाकी वाहनांची गर्दी झाली होती. दुपारी १२ वाजल्या पासून प्रमुख कार्यकर्ते व मतदार संघातील लोकांसह मा. आ. भीमराव धोंडे यांच्यासह कार्यकर्ते यांचा रोड शो झाला. रोड शोमध्ये मतदार संघातील अठरा पगड जातीचे लोक उस्फूर्तपणे सहभागी झाले होते. ढोल, ताशा व हलगीच्या तालावर आपापल्या हातातील झेंडे मिरविणाऱ्या कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. विविध वाहनांचा ताफा, विविध रंगाचे झेंडे, कार्यकर्त्यांची झुंबड, लोकांची गर्दी, शिट्यांचा आवाज आणि महिलांची सभेला लक्षणीय उपस्थिती होती . रोड शोमध्ये कार्यकर्त्यांच्या हातात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे व लोकनेत्या पंकजा मुंडे यांचे फोटो घेऊन मिरवत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व माजी सभापती साहेबराव म्हस्के यांनी सांगितले की, २००९ मध्ये माजी आमदार भीमराव धोंडे यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांना सहकार्य केले. गेल्या लोकसभेला आ. पंकजाताई मुंडे यांना सहकार्य केले. भारतीय जनता पक्षाचे काम अवघड झाले आहे. माझा पक्ष भीमराव धोंडे हेच आहेत. माजी आमदार भीमराव धोंडे म्हणजे शांतता असते व विकास असतो.जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आमदार असतो भांडणे लावण्यासाठी नसतो. ते शेतकऱ्यांसाठी पायी दिल्लीला गेले. कुकडीच्या पाण्यासाठी मुंबईला पायी गेले. शैक्षणिक संस्थामुळे ग्रामीण भागातील मुली आपापल्या गावात शिकु लागल्या आहेत. आ. पंकजाताई मुंडे आपला पक्ष आणि माजी आमदार भीमराव धोंडे हे आपले नेते आहेत. उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीत मा. आ.भीमराव धोंडे यांनी सहकार्य केले इतर कोणीही सोबत नव्हते. भीमराव धोंडे यांनी मुंडे घराण्याशी कधीही विश्वासघात केला नाही. ज्यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे, आ. पंकजाताई ताईंना त्रास दिला त्यांच्या बदल्याची निवडणुक आहे. खरोखरच पाटोदा तालुक्यातील रस्ते विकास मा. आ. भीमराव धोंडे यांनी केला. युवा नेते अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, आपली शिट्टी २३ नोव्हेंबर पर्यंत वाजली पाहिजे. आणि २३ नोव्हेंबरला आपल्याला विजयाचा गुलाल घ्यायचा आहे. तरुणांनो आपापले बुथ व्यवस्थित सांभाळा, काही अडचण आल्यास थेट मला संपर्क करा. प्रास्ताविक करताना ॲड. रत्नदीप निकाळजे यांनी सांगितले की, असाच उत्साह आपल्यात ठेवा व शिट्टीचा आवाज विधानसभेत पाठवा, सरपंच दादासाहेब जगताप यांनी सांगितले की,आजच विजय झाला आहे एवढी प्रचंड सभा आहे.राजपाल शेंडगे म्हणाले की,आपले उमेदवार स्वच्छ, शांत स्वभावाचे आहेत. येणारा काळ संघर्षाचा आहे त्यामुळे अजयदादा यांनी वाल्मिक कराड व्हावे. माजी सरपंच बाळासाहेब पवार यांनी सांगितले की, मतदारसंघात विकास व शांतता ठेवण्यासाठी भीमराव धोंडे यांना आमदार करा.माऊली पानसंबळ यांनी सांगितले की,एवढी

## शिट्टीच्या आवाजाने आष्टी परिसर दणाणला ,आष्टीत जनसागर उसळला होता. ऐतिहासिक असा रोड शो संपन्न झाला.

गर्दी हिच विजयाची नांदी आहे. माजी जि. प. सदस्य अशोकराव सव्वाशे यांनी सांगितले की, आपल्यासाठी चांगले वातावरण आहे आपला विजय निश्चित आहे. मनोजदादा जरांगे पाटील यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उमेदवार पाडा. जि. प. सदस्य रामराव खेडकर यांनी सांगितले की, राज्यात अपक्षांचे सरकार येणार आहे. माजी आ. धोंडे यांनी कधीही कोणाला त्रास दिला नाही म्हणून त्यांना मतदान करा. भीमराव धोंडे हे कोणालाही धोका देणारे नाहीत. माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी सांगितले की, मतदारसंघात काही उपद्रवी लोक आहेत त्यांना वेळीच रोखले पाहिजे. रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी सांगितले की, ना. रामदास आठवले व जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे माझ्या हृदयात आहेत.माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड या म्हणाल्या की,या निवडणुकीत माजी आ. भीमराव धोंडे यांना साथ द्या,लोकसभा निवडणुकीतील विश्वासघात जनता विसरली नाही. युवा नेते अशोकराव दहिफळे यांनी सांगितले की, सध्या कोठेही जा पण पण २० तारखेला एकत्र या. याप्रसंगी लालाभाऊ कुमकर, नियामत बेग, पांडुरंग गावडे, गौतम ससाणे, सईद चाऊस, देविदास शेंडगे,योगिताताई गवळी व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमास माजी जि. प. सदस्य सतिष झगडे,मोहनराव घुले, काकासाहेब लांबरुंड, भगवान तळेकर, विकी शेकडे, मुरलीधर पाचे, सुदाम झिंजुर्के, तुकाराम चव्हाण, नईम शेख, संजय कांकरिया, सरपंच सावता ससाणे, दादासाहेब विधाते, युवराज कटके, आस्ताक शेख, सरपंच अभय गर्जे, हादी शेख, आण्णासाहेब लांबडे, केदार जगताप, झुंबर चव्हाण, बाबुराव कदम, संजय सानप, अरुण सायकड, महारूद्र खेडकर , एकलव्या संघटनेचे रावसाहेब पिंपळे, सुधीर ढोबळे, आजिनाथ गवळी, चेअरमन दादासाहेब हजारे,आस्ताक शेख, हादी शेख यांच्या सह प्रचंड जन समुदाय उपस्थित होता. मतदारसंघाच्या वतीने अपक्ष उमेदवार माजी आमदार भीमराव धोंडे,सौ. दमयंतीताई धोंडे, अजयदादा धोंडे व इतर प्रमुख कार्यकर्त्यांचा भव्य पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. रत्नदीप निकाळजे यांनी केले. निलेश दिवटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश बडे यांनी आभार मानले. जाहीर सभेस आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदार बंधू भगिनी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. आष्टी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते दुचाकी रॅलीने आले होते. प्रचार सभेत कडा येथील सुधीर ढोबळे, परमेश्वर खेडकर, सतिश भैय्या आंधळे, विष्णू गोल्हार, तसेच राजु गावडे, बापु मेरगळ, संपत खुरंगे, साईनाथ मेरगळ, ॲड. संभाजी दहातोंडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या गटात प्रवेश केला.

# शेतकऱ्यांचं किती लाखांचं कर्ज माफ करणार? ; शरद पवार यांची महागॅरंटी

राज्यात निवडणूकीचा प्रचार चांगलाच रंगात आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीने सभांचा धडाका लावला आहे. नागपुर येथील संविधान संमेलनाला उपस्थित राहील्याने कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुंबईतही सभा घेतली. बीकेसी येथे झालेल्या या सभेत राहुल गांधी यांनी घोषणांचा अक्षरश: पाऊसचा पाडला. महायुतीच्या दशसूत्रीला महाविकास आघाडीने आपल्या गॅरंटीने उत्तर दिले. या जाहीर सभेत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनीही जोरदार भाषण केले. महाविकास आघाडी सत्तेत आली तर कृषी क्षेत्रातील अनेक प्रश्न सोडविले जातील आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले जाईल असे आश्वासन शरद पवार यांनी यावेळी दिले आहे. शरद पवार म्हणाले की

## 3 लाखपर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल

शरद पवार पुढे म्हणाले की कृषी क्षेत्राची गॅरंटी आम्ही देत आहोत. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वातील सरकार होतं. शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता होती. आम्ही ७१ हजार कोटींचं कर्ज माफ केलं. शेतकऱ्यांच्या शेतीला १२ टक्क्यांचे व्याज ६ टक्क्यावर आणले. नंतर तो ३ टक्क्यांवर आणला. आज आम्ही सांगतो की, तुम्ही सत्ता दिल्यास कृषी समृद्धी योजना राबवली जाईल. त्यात ३ लाखपर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल. नियमित कर्ज फेडत असतो त्याला ५० हजार रुपये प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत दिली जाईल. शेतकरी बळीराजा आहे. तुमच्या माझ्या भूकेची समस्या सोडवणारा आहे.आज आत्महत्या करण्याची परिस्थिती त्याच्यावर आली आहे. भाजप त्यांच्या दुखाकडे ढुंकून पाहत नाही. त्यावर उत्तर शोधलं पाहिजे. त्यासाठी आम्ही आलो आहोत असेही शरद पवार यावेळी म्हणाले.

तुम्ही लोकसभेच्यावेळी ४८ जागांपैकी ३१ जागा आम्हाला दिल्या. आम्हाला शक्ती दिली. आता विधानसभा आहे. राज्य कसं चालवायचं याचा निकाल घेण्याची ही वेळ आली आहे. गेल्या पाच वर्षात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील सरकार सोडलं तर बाकीचा कालखंड महाराष्ट्राला मागे नेणारा ठरला आहे.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांना एकदा संधी देऊन विधानसभेत पाठवा-आमदार इद्रिसजी नाईकवडी

बीड (प्रतिनिधी)
दि.६ : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे अल्पसंख्याक समाजासाठी मदतीला धाऊन येणारे नेते आहेत. त्यांनी समाजाच्या योजना अंमलात आणल्या. राष्ट्रवादी पक्ष महायुतीसोबत गेल्यामुळे अल्पसंख्याक समाजाची विरोधकांकडून दिशाभूल केली जात आहे. अल्पसंख्याक



समाजाच्या विकासासाठी धडपड करणारे युवा नेतृत्व डॉ.योगेश क्षीरसागर यांना एकदा संधी देऊन विधानसभेत पाठवा, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इद्रिसजी नाईकवडी यांनी केले आहे. बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ शहरात बुधवारी आयोजित केलेल्या अल्पसंख्याक मेळाव्यात ते बोलत होते. व्यासपीठावर बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, राष्ट्रीय सरचिटणीस साजिद बेग काझी, राष्ट्रीय उपाध्यक्ष शेख शफीक, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, जिल्हा कार्याध्यक्ष



रमिज खान, ज्येष्ठ माजी नगरसेवक सादेक उज्जमा, नसीर अन्सारी, जुनेद जहागीरदार, बागवान समाजाचे अध्यक्ष हशम बागवान, हाजी असीम बागवान, जकिरिया साहेब, इलियास मेंबर, युवा नेते इरफान बागवान, बिलाल भाई, सद्दाम भाई, जावेद खान, माजेद कुरेशी, साजेद जहागीरदार, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर शेख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आ.इद्रिस नायकवडी म्हणाले की, अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात अल्पसंख्याक समाजासाठी काम करता येत आहे. ते समाजासाठी शिक्षण, संरक्षण व आरक्षण हे महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असतात. सामान्य लोकांच्या हक्क व अधिकारांसाठी अजितदादा हे महायुतीत सहभागी झाले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जरी महायुतीत सहभागी झाला असला तरी आपली विचारधारा सोडलेली नाही. भविष्यात सोडणारही नाही. मात्र राष्ट्रवादी पक्ष महायुतीसोबत गेल्यामुळे अल्पसंख्याक समाजाची दिशाभूल केली जात आहे. समाजाच्या मनात गैरसमज निर्माण केले जात आहे. अजितदादांनी मागच्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाचे ३० कोटीवरून ७०० कोटी वर नेले. प्रत्येक मदरसा लसाठी वर्षाला १० लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला. मुस्लिम समाज कुठल्याही गोष्टीवर सहज विश्वास ठेवतो. त्यामुळे लोकसभेत ज्या चुकीच्या अफवा पसरवल्या गेल्या, त्यामुळे चुकीच्या लोकांना मतदान केले. मात्र यावेळी विधानसभेला ही चूक करू नका. लोकसभेला काय घडले कसे घडले याचा विचार न करता विधानसभा निवडणुकीत मात्र अजितदादा, धनुभाऊ आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन आ.इद्रिस नायकवडी यांनी केले.

## अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी कायम प्रयत्नशील : डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, अजितदादा यांनी वादा केल्याप्रमाणे विधानसभेत १० टक्के अल्पसंख्याक समाजाचे उमेदवार दिले. विधान परिषदेत २ पैकी १ आमदार इद्रिस नायकवडी यांच्या रूपाने अल्पसंख्याक समाजाचे नेतृत्व विधानपरिषदेत पाठवले. अल्पसंख्याक समाजासाठी मार्टी रिसर्च सेंटर मंजूर करून निधी उपलब्ध करून दिला. क्षीरसागर परिवार हा मागील ५० वर्षांपासून लोकांची सेवा करत आहे. बीडमध्ये तकिया मस्जिदशेजारील जागा ही कब्रस्थानसाठी दिली. बालेपीर येथील इदगाह, पेठ बीड भागातील जुना इदगाह यासाठी कंपाऊंड वॉलसाठी निधी उपलब्ध केला. अल्पसंख्याक समाजासाठी बीडमध्ये ५ तर ग्रामीण भागात २ कोटी रुपये मंजूर करून आणले. नवगण, विनायक संस्थेत अल्पसंख्याक समाजाचे १० टक्के कर्मचारी आहेत. आपण सर्व जातीधर्माला सोबत घेऊन विकासकामे करत राहू, असा विश्वास देत २० तारखेला मोठ्या संख्येने मतदान करून निवडून देण्याचे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

## माजी नगरसेवक जुनेद जहागीरदार यांचा प्रवेश

बीड नगरपरिषदेचे माजी नगरसेवक जुनेद जहागीरदार यांच्यासह साजेद जहागीरदार, आमेर जहागीरदार, समीर शेख, इम्रान शेख यांच्यास कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com